News paper article by Sardar Date- 4/2/86
solve problems of drought affected students." in 'Gaokari'"

# दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवा

संपूर्ण महाराष्ट्रावर आज दुष्काळाचे सावट पसरले आहे आणि या दुष्काळाचे गांभीर्य लोकांना दिवसेंदिवस जाणवू लागले आहे. या परिस्थितीची झळ समाजातील दलित आदिवासी, भटक्या विमुक्त जाती, लहान शेतकरी आणि भूमिहीन शेतमजूर आदि सर्वांत तळाच्या व गरीब घटकांना लागत आहे. ग्रामीण भागातील आर्थिक हलाखीची परिस्थिती व अपुरे वेतन तसेच अपुऱ्या पावसाअभावी शेतीमधून उत्पन्न न मिळाल्यामुळे या घटकांसमोर फार मोठा पेचप्रसंग निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीतही या थरातील हजारो विद्यार्थी शहरामध्ये आणि तालुक्यांच्या ठिकाणी येऊन शिक्षण घेत आहेत. परंतु या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना आपले शिक्षण अर्धवट सोडून देण्यास भाग पडेल असा धोका निर्माण झाला आहे.

या विद्यार्थ्यांना जेवण खाण्याच्या सुविधा केवळ समाजातील दानशूर व्यक्ती व सामाजिक संस्था यांच्यामार्फत उपलब्ध होऊ शकतील असे मानणेअवास्तव आणि अव्यवहारिक ठरेल म्हणून वार्षिक परीक्षेपर्यंतच्या सुमारे पाच महिन्याच्या काळात विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांकडून कोणतीही आर्थिक मदत किंवा अन्य जेवण खाण्याच्या सुविधा मिळू शकणार नाहीत. म्हणून या पाच महिन्याच्या काळातील त्यांच्या जेवणाखाण्याचा सर्व खर्च सरकारने उचलावा अशी आमची मागणी आहे.

## प्रवास मोफत असावा

त्याचप्रमाणे वसतीगृहात न राहणाऱ्या आणि शहराच्या व तालुक्याच्या परिसरातून येऊन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटी प्रवासाच्या भाड्याचा खर्च पडत असतो. हा खर्च त्यांच्यावर लादणे आजच्या परिस्थितीत त्यांच्या आर्थिक हालाखोत भरत्व टाकणारी गोष्ट आहे, असे आम्हाला वाटते. म्हणून त्यांच्या प्रवास भाड्याचा खर्च आणि त्यांच्या जेवण खाण्याचा खर्च याचा बोजाही सरकारने उचलावा व त्यांना हे प्रवासभाडे माफ करावे.

महाराष्ट्र सरकारने दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांची दहावी व बारावीचीपरीक्षा फी माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय योग्य असून अशीच तरतूद सर्व विद्यार्थीसाठीकेली जावीयाची अंमलबजावणी चोखपणे व तातडीने करण्यात यावी. आजवरचा आमचा अनुभव असा आहे की, परीक्षा फी माफ झाल्यावरही दीर्घकाळपर्यंत त्याची अंमलबजावणी होत नाही. आजच्या परिस्थितीत हे टाळण्यासाठी त्याची अंमलबजावणी चोखपणे व तत्परतेनें होते की नाही याचे निरीक्षण करण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा तयार केली जावी व या यंत्रणेमध्ये विद्यार्थ्यांना योग्य प्रतिनिधीत्व असावे. विशिष्ट मुदतीमध्ये विद्यार्थ्यांनी भरलेली परीक्षा फी त्यांना परत देण्याचे बंधन सरकारने घालून घ्यावे व ती मुदत सरकारने जाहीर करावी. या तारखेनंतर जर काही प्रकरणे विद्यार्थी प्रतिनिधींच्या नजरेस आली तर त्याचे निवारण करण्याची जबाबदारी शासकीय नोकर यंत्रणेवर राहील असा निर्णय सरकारने घ्यावा.

शहरी व ग्रामीण तालुक्याच्या ठिकाणी खाजगी खानावळीतून विद्यार्थ्यांच्या सवलतीच्या दरातील जेवणाची सोय जेथे उपलब्ध होऊ शकणार नसेल तेथे सरकारने अशी सार्वजनिक केंद्र काढून विद्यार्थ्यांच्य जेवण खाणाची सोय तातडीनेकरावी.

शिक्षण क्षेत्रातील सर्व शाखांच्य विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य सवलतीच्या दरामध्ये सरकारने उपलब्ध करून द्यावे.

पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील सर्व शाखांमधील दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या वतीने आम्ही वरील पाच मागण्या करत आहोत. दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य आणि परीक्षाजवळ आल्या आहेत हे लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकार तातडीने निर्णय घेईल व त्याची अंमलबजावणी चोखपणे व तत्परतेने करेल अशी आम्ही आशा व्यक्त करतो.


**अजित सरदार**
युवक क्रांतीदल, १२४३–२, आपटेरोड
शिवाजीनगर, पुणे-४